# राशिभविष्य - मे, २०१७.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==============================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीचा वर्तमान स्वभाव अत्यंत अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असून कोणाचाही धाक, दडपण, कोणी केलेला उपदेश सहन होत नसावा, असे वाटते. या राशीची लहान मुले तर सध्या अत्यंत हूड, व्रात्य अशी झाली असावीत असे वाटते. त्यामुळे मन व विचारशक्तीवर ताबा न राहून नको ते बोलले , घडले जाण्याची शक्यता आहे. जपा. जिभेला लगाम घाला व मनावर संयम ठेवून आणि सहनशील बनून आचरण करा. तेच सुखाचे होईल. या महिन्याच्या काळात - विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात शारीरिक-मानसिक अनारोग्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर विशेष जपले पाहिजे. काही मंडळीना शारीरिक-मानसिक थकावट येणे संभवते. काहींना नेत्रविकार तर काहींना उष्णता विकारांचा आजार त्रस्त कारीलसे दिसते. तसेच आर्थिक समस्या त्रस्त करण्याची दाट शक्यता दिसते. देणे द्यावेच लागेल, पण येणे वसूल होण्याची शक्यता दिसत नसल्याने अस्वस्थता जाणवेल. जपा. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण झाल्यामुळेही काही मंडळींना गहरे नैराश्य येणे संभवते. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. पण या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे महिन्याच्या उत्तरार्धात आरोग्य सुधारेल. या राशीच्या युवकांनी कुसंगतीपासून जपावे. मैत्रीत बाधा येणार नाही, इकडे लक्ष द्यावे. कमिशन, दलाली वर व्यवसाय करत असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक जाईल. तसेच शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र व बौद्धिक कार्यक्षेत्र तसेच वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांनाही संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिक तांत्रिक व्यवसाय, औषध विक्रेते यांना महिन्याचा उत्तरार्ध अधिक लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. कारण रवि-मंगळ- हर्शल - शनि हे महत्त्वाचे ग्रह पूर्णपणे प्रतिकुल आहेत. त्यामुळे या राशीच्या मंडळींना शारीरिक-मानसिक अनारोग्याचा त्रास सहन करावा लागण्याची दाट शक्यता आहे. शनि ग्रहामुळे मनस्ताप देणाऱ्या घटनांचा असह्य त्रास तसेच वातपित्त विकारांनी शारीरिक अनारोग्य होणे संभवते. जपा. व्ययस्थानी असलेला हर्षल सांपत्तिक अडचणी, वाईट, जिवावरचे प्रसंग निर्माण करण्याची शक्यता वाटते. तसेच शत्रुत्व निर्माण होणे, बेअब्रूचे प्रसंग येणेही शक्य आहे. जपा. रवि ग्रहामुळे मानसिक अस्वास्थ्य निर्माण करणाऱ्या घटना घडतील. त्यामुळे शारीरिक आरोग्यावर परिणाम होणेही शक्य आहे. हट्टी स्वभाव व मानापमान फार यामुळे अकारण श्रम, दगदग सहन करावी लागेल. त्यामुळे शारीरिक अनारोग्यही होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात आर्थिक समस्या त्रस्त करतील. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून डोळे तळावण्याची, घशाचे विकार बळावण्याची शक्यता आहे. राहूमुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडतील. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. प्रेमसंबंध वाढतील. आर्थिक लाभ होतील. या राशीच्या युवकांनी नवीन काही करण्याचा प्रयत्नही करू नये. आहे ती नोकरीच करावी. इतर

नोकरी-व्यवसाय असणारांना अस्थिर परिस्थितीला सामोरे जावे लागेल. केवळ मानसिक आजार तज्ञ आणि द्रव पदार्थाचे व्यापारी यांना
काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल
घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या राशीच्या मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. त्यामुळे जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करा. कारण महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे काही मंडळीना नैराश्य येणे संभवते. आर्थिक चिंताही सतावतील. काही मंडळीना जुन्या दबलेल्या प्रकरणाचा पुन्हा असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला राहू इतर सर्व बाबतीत अनुकुल असला तरी काही मंडळीना कोर्ट प्रकरणाचा त्रास होणे संभवते. तसेच काही मंडळींच्या बंधुसुखात काही कारणाने बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण नातेवाईक मंडळींपैकी कोणाकडून असह्य मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. ज्यांना स्थावर खरेदी-विक्रीचा व्यवहार करावयाचा असेल त्यांना ते व्यवहार सुरळीतपणे करणे शक्य होईल. काही मंडळींच्या बाबतीत “वरून कीर्तन, आतून तमाशा" असे ढोंगी आचरण होणे संभवते. तसे करू नका. स्वत:चेच हसे करून घ्याल. जपा. अध्यात्मात रस असणारांना उपासने द्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच काही मंडळीना सूचक स्वप्ने पडतील; तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांच्या कार्यक्षेत्रात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता जाणवते. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे काही मंडळींच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच काहीना कुसंगतीची बाधा नुकसानकारक होईल. जपा. श्रद्धेने दररोज नियमितपणे “ बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे “ पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. काही मंडळीना कष्ट-परिश्रम करूनच यश व धन प्राप्त होईल. पण नोकरदार मंडळीच्या इच्छा आकांक्षा पूर्ण होण्याची शक्यता आहे. काही मंडळीना मानाचे स्थान, प्रतिष्ठा असे काही मिळू शकेल. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना अपेक्षित प्रगती साधणे व यश मिळवणे सहज शक्य होईल. काही मंडळीना थोरामोठ्यांच्या ओळखीने काही लाभ प्राप्त होतील. वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांनाही काळ लाभदायक होईल. काहीना मौल्यवान गोष्टींचा लाभ होणेही संभवते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मनस्ताप, मानहानीच्या घटना घडणे संभवते. जपा. नोकरी-व्यवसायास काळ अनुकुल असला तरी कौटुंबिक सुखाच्या दृष्टीने काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. कुटुंबात कलहकारक घटना घडतील. विशेष करून आर्थिक समस्या त्रस्त करतील. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. काही मंडळीना प्रवासाचे योग येतील. पण भावंडाकडून मनस्ताप दिला जाणेही संभवते. तसेच वैवाहिक जीवनातील सुखातही काहीही कारणाने बाधा येऊ शकेल. जपा. शक्यतो जलप्रवास

टाळा. अपघात भय संभवते. तसेच विषबाधा होणेही संभवते. जपा. भाग्यस्थानी असलेल्या शुक्र
ग्रहामुळे काहींना गुरुकृपा प्राप्त होईल. मनोनुकुल घटना घडतील व काही भाग्यवान मंडळीना प्रसिद्धी मिळणेही संभवते. ही गुरु ग्रहाची उच्च व अनुकुल राशी असल्याने या राशीच्या मंडळीनी
दररोज नियमितपणे गुरु दत्तात्रेयाची उपासना करावी व " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे" पठण करावे.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. तसेच प्रतिकुल परिस्थिती निर्माण होऊन मानहानी होणे संभवते. शिवाय कामाचा असह्य ताण सहन करावा लागण्याची शक्यताही जाणवते. अशा परिस्थितीत आपल्या अहंकारी व अधिकारशाही स्वभावावर नियंत्रण ठेवू शकलात तर खूपच सुखाचे होईल. सतत मनावर संयम ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण केलेत तर होणारा मनस्ताप खूपच सुसह्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात ग्रहस्थिती अनुकुल होत असल्याने नोकरी-व्यवसायात मनोनुकुल व लाभदायक घटना घडतील. काहींना बढती, पगारवाढ असे काही मिळू शकेल. मोठ्या अधिकारी मंडळींशी परिचय होईल. काही भाग्यवान मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. तरीही महिन्याचा अखेरचा सप्ताह थोडा मनस्ताप देणारा असाच सिद्ध होईल. मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. जपा. गूढ व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणांनी बाधा येणे संभवते. तसेच या राशीच्या मंडळीच्या संततिसुखात बाधा येणे संभवते. गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख समाधान लाभेल. कुटुंबात शुभ घटना घडतील. शुक्रामुळे काहीना भूमिलाभ तर काहींना प्रतिष्ठा प्राप्त होईल. पण वैवाहिक जीवनात वाद, मतभेद, अनारोग्य अशापैकी कारणांनी अपेक्षित सुख लाभणे कठीण होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात काल्पनिक चिंता त्रस्त करतील. काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. पण सुखस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे मातेशी वाद, भांडणे, मातेचे आजारपण अशापैकी कारणानी अपेक्षित मातृसुख व गृहसौख्य मिळणे अशक्य होईल. तसेच जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील गैरसमज , वाद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुख लाभणेही कठीण होईल. काही मंडळीना कुसंगतीची बाधा होणे संभवते. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास होणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. कामाचा ताण व अन्य कारणांनी होणारा मनस्ताप असह्य होईल. पण यांत्रिक तांत्रिक व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते अशांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल . अपेक्षित संततिसुख लाभेल. व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे हितशत्रूंपासून रक्षण होईल. आर्थिक लाभ होतील. काही मंडळीना

परदेशगमनाची संधी मिळेल. पण हाच राहू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा आणील. आरोग्य चांगले राहील. या राशीचे लेखक, साहित्यिक व पुस्तकविक्रेते, अन्य बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना या महिन्याचा काळ अनुकुल, यशदायक व लाभदायक होईल. विचारांच्या तंद्रीत वाहन चालवू नका, मोबाईलवर वार्तालाप करू नका. अपघात भय आहे. जपा. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील. तसेच राहूमुळे संततिविषयक एखादी चिंता त्रस्त करील. जपा. या राशीच्या अधिकारी मंडळीना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य असले तरी तो मोह त्यांनी कटाक्षाने टाळावाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. तसेच जुगारी मार्गाने धनवान होण्याचा मोहही नुकसानकारक होईल. जपा. भावनेच्या भरात कोठेही भरकटत जाऊ नका. पण या राशीच्या काही युवकांना उत्तम नोकरी वा नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता जाणवते. नोकरी-व्यवसायात मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. त्याचा शारीरिक-मानसिक आरोग्यावर परिणाम होणे संभवते. त्यामुळे काही मंडळीना पोटविकाराचा आजार त्रस्त करीलसे दिसते. पण कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. तसेच अध्यात्म, समाजसेवा अशा गोष्टीत रस असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे उष्णतेचे विकारांनी अनारोग्य होणे संभवते. काही मंडळीना शारीरिक मानसिक कष्ट सहन करावे लागतील; तर काहींना मूळव्याधीसारखा आजार त्रस्त करील. तसेच एखादा अपघात घडून हाडमोड होणेही संभवते. जपा. जीवनसाथीचे लहरी , विक्षिप्त आचरण, दोघांतील वाद, मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळणेही अशक्य होईल. अनारोग्य, अभ्यासेतर गोष्टींचा मोह अशापैकी कारणांनी या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होतील. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास होणे संभवते. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना अनुकुल होईल व मन शांत राहील.

**(८) वृश्चिक -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असला तरी मनावर संयम ठेवून व सहनशील बनून समजूतदारपणे आचरण करू शकलात तर खूपच सुखाचे होईल. शिवाय त्यामुळे कुटुंबात घडणारे अनिष्ट टाळू शकाल. हे सांगण्याचा उद्देश असा की या महिन्याचा काळ या राशीच्या मंडळींना कौटुंबिक सुख व गृहसौख्याच्या दृष्टीने प्रतिकुल असल्याचाच अनुभव येणे संभवते. काही मंडळीना कोर्ट प्रकरणाचा मनस्ताप सहन करावा लागेल; तर काहींना आर्थिक समस्या त्रस्त करतील. कर्ज काढून सण साजरा करू नका. आपल्या संतापी स्वभावामुळे घरात कोणाशी पटणार नाही. गैरसमज निर्माण होतील असे आचरण करू नका. काल्पनिक चिंता करू नका. विषभय असल्याने शक्यतो उघड्यावरचे खाद्य पदार्थ खाऊ नका. जीवनसाथीचे अनारोग्य, अन्य कटकटी यांमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. भागीदारी व्यवसाय असेल तर त्यात गैरसमजाने वा संशयाने बाधा येणार नाही, याची काळजी घ्या. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मानसिक-शारीरिक कष्ट होणे संभवते. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकारांनी अनारोग्य होणे संभवते. अति विचार

करू नका. डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा आजार होईल. जपा. तसेच जलभय असल्याने जलप्रवास करू नका. या राशीच्या नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक- होईल. शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक व यशदायक होईल. लाभस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे विवाहेच्छूचे विवाह ठरतील. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. संततिसुख लाभेल. श्रद्धेने शिवोपासना व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे "हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. विशेष करून महिन्याचा पूर्वार्ध घरीदारी सर्व ठिकाणी मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता जाणवते. तसेच आरोग्यविषयक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता दिसते. महिन्याचा उत्तरार्ध नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होणे संभवते. शनि-मंगळ-रवि हे महत्त्वाचे ग्रह प्रतिकुल असल्याने उष्णताविकार, वातविकार बळावून अनारोग्याचा त्रास होणे संभवते. विशेष करून मनस्ताप देणाऱ्या घटना आणि मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना घडल्यास गहरे नैराश्य येणे संभवते. जीवनसाथीचे अनारोग्य, कुटुंबातील प्रिय जनांचे दूरत्व , घडणाऱ्या अनिष्ट घटना; काहीना शारीरिक उष्णता भडकून ताप येणे , इजा होणे, अंगावर फोड येणे, रक्तविकार , हृदयविकार बळावणे अशापैकी आजार होणे, चोरीमुळे आर्थिक नुकसान होणे, काहींना अपप्रचाराचा त्रास होणे, अशापैकी घटना घडण्याची शक्यता जाणवते. तसेच काही मंडळीना संततिविषयक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरी-व्यवसायातही मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. अशा परिस्थितीत मनावर संयम ठेवून , सहनशील बनून, जिभेला लगाम घालून काळ व्यतीत करणेच सुखाचे होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात वैवाहिक जीवनात व भागीदारी व्यवसाय असणारांच्या भागीदारीत बाधा येणे संभवते. जपा. अशा परिस्थितीत गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काहींना जलप्रवासाची तर काहींना परदेशवारीची संधी मिळेल. विशेष करून बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकूल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा. हनुमानचालिसा स्तोत्राचे दररोज नियमितपणे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ चालू असल्याने त्यांनी सतत भावविचारांवर आणि भरकटणाऱ्या मनावर ताबा ठेवून, सहनशील बनून व शक्यतो मौन पाळून आचरण करणेच सुखाचे होईल. तसेच सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावधानतेने करावेत असे आग्रहाने सांगावेसे वाटते. मनाविरुद्ध घडणारे सर्व काही प्रतिक्रिया न देता सहन करावे व विपरीत काळ व्यतीत करावा. तेच सुखाचे होईल. या राशीच्या व्ययस्थानी असलेला शनि ग्रह मनस्तापदायक असल्याचाच अनुभव येईल. काहींना कोर्ट प्रकरणाला तोंड द्यावे लागेल. आर्थिक चिंता त्रस्त करतील. कौटुंबिक वाद, गैरसमज, भांडणे, सतत मनस्ताप देणाऱ्या घटना यांमुळे अस्वस्थ व्हाल. जपा. आहे ती परिस्थिती मुकाट्याने सहन करीत काळ व्यतीत करा. तरच आरोग्य बिघडणार नाही. या राशीच्या नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ नोकरीत मनस्ताप देणाऱ्या घटना सहन करीत व्यतीत करावा लागेल. घरातील कोणाशीच न

पटल्याने अस्थिर अवस्था होणे संभवते. “अरे ला कारे" केलेत तर आगीत तेल ओतल्यासारखेच होईल. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय , वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते अशांना महिन्याचा अखेरचा सप्ताह खूपच लाभदायक होईल . या राशीच्या विद्यार्थ्यांना अनारोग्य, अस्वस्थ मनस्थिती, नैराश्य अशापैकी कारणांनी मनापासून अभ्यास करणे अशक्य होईल. शुभ ग्रह गुरु-शुक्र यांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींची मानसिक अवस्था अत्यंत कोमल झाली असून मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असाव्यात, असे वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच मन उदास होत असावे, असे वाटते. पण या राशीच्या मंडळींनी मन खंबीर करून काळ व्यतीत केला तर शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून घडणाऱ्या सुखद व लाभदायक घटनांचा ते मनमुराद आनंद लुटू शकतील. नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या राशीच्या मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, वेतनवाढ, एखादे अधिकार पद मिळणेही संभवते. वरिष्ठ कामाची प्रशंसा करतील. उच्च बौद्धिक आणि शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना अपेक्षित प्रगती साधणे व यश मिळवणे शक्य होईल. पण महिन्याचा उत्तरार्ध मात्र या राशीच्या सर्व नोकरदार मंडळीना घरीदारी मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. नियोजित कार्यात अडथळे येणे, अनारोग्याचा त्रास होणे, कुटुंबात गैरसमज, वाद, भांडणे होणे, असमाधानकारक घटना घडणे संभवते. काहींना राहत्या जागेची तर काहींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात संततिविषयक समस्या त्रस्त करतील. राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच मनात नको ते विचार उफाळून येतील. वाममार्ग धनाचा लोभ निर्माण होईल. लोखंड , पोलाद यांचा व्यापार असणारांना व यांत्रिक तांत्रिक व्यवसाय असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग असेल अशापैकी काहीना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहीना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना सात्विक मन:शांती देईल.

**( १२ ) मीन -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचा स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा घडण्याची दाट शक्यता वाटते. कोणाचाही कळत न कळत अपमान होऊ नये यासाठी सतत जिभेला लगाम घालून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. नपेक्षा आपल्या जहरी बोलण्याने समोरच्याचा अपमान होईल. जपा. मनस्थिती उदास, निराश अशी राहीलसे वाटते. महिन्याच्या पूर्वार्धात वाढत्या खर्चाची चिंता त्रस्त करील. काहींची आर्थिक फसवणूक होणेही संभवते. जपा. गैरसमजाने प्रिय जनांशी वाद भांडणे होणे संभवते. जपा. काही मंडळींना नेत्रविकाराचा आजार त्रस्त करील. महिन्याचा उत्तरार्ध नोकरी-व्यवसायात लाभदायक होईल. मनोनुकुल घटना घडतील. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. परधर्मीयांशी ज्यांचा व्यावसायिक संबंध असेल त्यांना अशा संबंधामुळे काळ लाभदायक होईल. गुप्त पोलीस खात्यातील मंडळींना काळ

लाभदायक होईल. या राशीच्या विवाहोत्सुक युवकयुवतीचे विवाह ठरतील. जुने प्रेमसंबंध घट्ट होतील. नवे स्नेहसंबंध निर्माण होतील. काहींना प्रवासाचे योग येतील. कोळसा, लोखंड व्यापार असणारांना काळ अनुकुल असून इतर प्रकारच्या व्यापार-व्यावसायिकाना काळ प्रतिकुल व हानिकारक होणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल; पण त्यासाठी त्यांना स्वत:चे सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. श्रद्धा असेल तर गुरुदेव श्रीदत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा " चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====